ePaper
‖ वर्ष - 8 । अंक -139 ‖ UDYAM-MH-26-0158827 ‖
महाईन्यूज ™
लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!
www.mahaenews.com | बुधवार, दिनांक 27 नोव्हेंबर 2024 | पुणे आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews

# मुंबईकरांची चिंता वाढली! वायू प्रदूषण धोकादायक स्तरावर



## आतील पानांत


- लिलावात 'बिहारी बाबू' मालामाल!
- मुंबईने घेतलाय रहस्यमयी फिरकीपटू
- लाथ मारल्यामुळे वरुण भडकला
- राहुल गांधींचं नागरिकत्व रद्द होणार?






KUMAR LIFESPACES
PRESENT FOR YOUR FUTURE
प्रायोजक

एक्सप्रेस मीडिया इंटरप्राईझेस, पुणे
प्रस्तुत
फेस ऑफ इन्स्पिरेशन
पुरस्कार वितरण सोहळा २०२४

Express | न्यूज एक्सप्रेस | महाईन्यूज

स्नेह निमंत्रण...

गुरुवार दि. २८ नोव्हेंबर २०२४ रोजी दुपारी ३ वा.
ठिकाण- प्रा. रामकृष्ण मोरे प्रेक्षागृह, चिंचवड.

प्रमुख मार्गदर्शक
श्री. अविनाश धर्माधिकारी
(माजी सनदी अधिकारी, संस्थापक,अध्यक्ष-चाणक्य मंडल परिवार)

प्रमुख आकर्षण
श्री. अंकुश चौधरी
(प्रसिद्ध मराठी अभिनेते)

प्रमुख पाहुणे
मा. श्री. महेशदादा लांडगे (आमदार, भोसरी विधानसभा)
मा. श्री. शंकर जगताप (आमदार, चिंचवड विधानसभा)
मा. श्री. आण्णा बनसोडे (आमदार, पिंपरी विधानसभा)
मा. श्री. अमेय इंद्रकुमार जैन (कुमार प्रॉपर्टीज लाईफस्पेस)
मा. श्री. सुनील शेळके (आमदार, मावळ विधानसभा)
मा. श्री. शेखर सिंह (आयुक्त, पिंपरी-चिंचवड महानगरपालिका)
मा. श्री. विनयकुमार चौबे (आयुक्त, पिंपरी-चिंचवड पोलीस आयुक्तालय)
मा. प्रा. कविता आल्हाट (शहराध्यक्ष, राष्ट्रवादी महिला काँग्रेस)

- निमंत्रक -
श्री. अधिकराव दिवे पाटील – संस्थापक, एक्सप्रेस मिडिया एंटरप्राइजेस
सौ.मनिषा थोरात-पिसाळ – न्यूज एक्सप्रेस मराठी संचालिका

# अकरापैकी एकाच नगरसेवकाला आमदारपद

## उर्वरित 10 जणांचे स्वप्न निवडणूक हरल्यामुळे भंगले

। पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**विधानसभा निवडणुकीत विविध पक्षांच्या एकूण ११ नगरसेवकांनी आमदार होण्यासाठी नशीब आजमाविण्याचा प्रयत्न केला. त्यापैकी केवळ भाजपच्या एका माजी नगरसेवकाला आमदार पदाची लॉटरी लागली आहे. कसबा विधानसभा मतदारसंघातील भाजपचे माजी नगरसेवक, माजी स्थायी समिती अध्यक्ष हेमंत रासने यांना आमदार होण्याची संधी मिळाली असून, अन्य दहा नगरसेवकांचा स्वप्नभंग झाला आहे.**



विधानसभा निवडणूक महायुती आणि महाविकास आघाडी अशी झाली. महायुतीमध्ये भाजप, शिवसेना (शिंदे) आणि राष्ट्रवादी (अजित पवार) असे तीन पक्ष तर, महाविकास आघाडीमध्ये कॉंग्रेस, शिवसेना (ठाकरे) आणि राष्ट्रवादी (शरद पवार) असे पक्ष एकत्रित होते. यातील सर्वच प्रमुख पक्षांतील एकूण ११ माजी नगरसेवक वेगवेगळ्या मतदारसंघातून निवडणुकीच्या रिंगणात होते. या ११ नगरसेवकांनी शहरातील सहा आणि ग्रामीण भागातील एक अशा सात मतदारसंघांतून निवडणूक लढविली होती. त्यामध्ये दोन माजी महापौर आणि एक उपमहापौर, यांचाही समावेश होता.कसबा मतदारसंघातून भाजपचे हेमंत रासने, कॉंग्रेसच्या बंडखोर उमेदवार, पुण्याच्या पहिल्या महिला महापौर कमल व्यवहारे, शिवाजीनगरमधून कॉंग्रेसचे दत्ता बहिरट, खडकी कॅन्टोन्मेंट बोर्डाचे माजी नगरसेवक मनीष आनंद, हडपसर विधानसभा मतदारसंघातून मनसेचे माजी गटनेते साईनाथ बाबर, राष्ट्रवादी (शरद पवार) पक्षाचे माजी महापौर प्रशांत जगताप, शिवसेना (ठाकरे) पक्षाचे बंडखोर उमेदवार गंगाधर बधे, पर्वती मतदारसंघातून राष्ट्रवादी (शरद पवार) पक्षाच्या माजी स्थायी समिती अध्यक्षा अश्विनी कदम आणि कॉंग्रेसचे बंडखोर उमेदवार, माजी उपमहापौर आबा बागुल, कोथरूड मतदारसंघात मनसेचे माजी गटनेते किशोर शिंदे, खडकवासला मतदारसंघातून राष्ट्रवादीचे (शरद पवार) सचिन दोडके या नगरसेवकांनी निवडणूक लढविली, तर शहरातील भाजपचे माजी नगरसेवक किरण दगडे पाटील यांनी भोर मतदारसंघात बंडखोरी करून निवडणूक लढविली. या पैकी केवळ हेमंत रासने यांना आमदार होण्याची संधी मिळाली आहे.रासने यांनी दोन वर्षांपूर्वी झालेली कसबा पोटनिवडणुकही लढविली होती. मात्र, त्या वेळी त्यांचा कॉंग्रेसचे माजी आमदार रवींद्र धंगेकर यांनी धक्कादायक पराभव केला होता. त्या पराभवाची सव्याज परतफेड रासने यांनी या निवडणुकीत केली. रासने यांनी धंगेकर यांना १९ हजारांपेक्षा जास्त मतांनी पराभूत केले. रासने वगळता अन्य कोणत्याही माजी नगरसेवकाला मोठ्या प्रमाणावर मतदान झालेले नसल्याचेही मतमोजणीच्या आकडेवारीवरून स्पष्ट होत आहे. मात्र, काही नगरसेवकांची बंडखोरी भाजप महायुतीच्या पथ्यावर पडल्याचेही दिसून येत आहे. विधानसभा निवडणूक महायुती आणि महाविकास आघाडी अशी झाली.

### रासने यांना आमदार होण्याची संधी

महायुतीमध्ये भाजप, शिवसेना (शिंदे) आणि राष्ट्रवादी (अजित पवार) असे तीन पक्ष तर, महाविकास आघाडीमध्ये कॉंग्रेस, शिवसेना (ठाकरे) आणि राष्ट्रवादी (शरद पवार) असे पक्ष एकत्रित होते. यातील सर्वच प्रमुख पक्षांतील एकूण ११ माजी नगरसेवक वेगवेगळ्या मतदारसंघातून निवडणुकीच्या रिंगणात होते. या ११ नगरसेवकांनी शहरातील सहा आणि ग्रामीण भागातील एक अशा सात मतदारसंघांतून निवडणूक लढविली होती.माजी उपमहापौर आबा बागुल, कोथरूड मतदारसंघात मनसेचे माजी गटनेते किशोर शिंदे, खडकवासला मतदारसंघातून राष्ट्रवादीचे (शरद पवार) सचिन दोडके या नगरसेवकांनी निवडणूक लढविली, तर शहरातील भाजपचे माजी नगरसेवक किरण दगडे पाटील यांनी भोर मतदारसंघात बंडखोरी करून निवडणूक लढविली. या पैकी केवळ हेमंत रासने यांना आमदार होण्याची संधी मिळाली आहे.

# कोथरूड येथे महिला पोलिसांचा सत्कार

## स्वाहा संघटनेच्यावतीने आयोजन



। पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**झाशीची राणी लक्ष्मीबाई यांच्या जयंतीनिमित्त 19 नोव्हेंबर रोजी राष्ट्रीय स्वाहा संघटनेच्यावतीने कोथरूड पोलीस स्थानक येथे महिला पोलिसांचा सत्कार करण्यात आला.**

कार्यक्रमात अनिलजी व्यास (भाग संघचालक, राष्ट्रीय स्वयंसेवक संघ) यांच्या हस्ते महिलांना सन्मानपत्र आणि गुलाबपुष्प देऊन त्यांचा गौरव करण्यात आला. या प्रसंगी अश्विनी कुलकर्णी (भागप्रमुख, राष्ट्रीय स्वाहा) आणि संस्थापक विश्वस्त विशाल कुलकर्णी यांनी कार्यक्रमाचे आयोजन केले होते.

महिला पोलिसांच्या योगदानाबद्दल गौरवोद्गार काढताना, "गणपती, नवरात्रोत्सव आणि निवडणुकांच्या बंदोबस्तासह राष्ट्रसेवेसाठी अहोरात्र दक्ष राहणाऱ्या महिला पोलिस आजच्या काळातील झाशीच्या राणी आहेत," असे मत यावेळी व्यक्त करण्यात आले. कार्यक्रमाचा समारोप "राष्ट्र प्रथम, वंदे मातरम्" या घोषणांनी करण्यात आला.

# बेशिस्त वाहतुकीचे पुणे परवाना चाचणीत 'नापास'

। पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।




वाहन चालविण्याचा पक्का परवाना काढण्यासाठीच्या चाचणीत उत्तीर्ण होताना पुणेकरांच्या नाकी नऊ येत असल्याचे समोर आले आहे. परवान्याविना बेदरकारपणे वाहने चालविणाऱ्यांचे शहर म्हणून कुप्रसिद्धी मिळविलेल्या पुण्यात पक्के परवाने काढायला गेलेले निम्मेच उमेदवार चाचणी उत्तीर्ण होऊ शकत असल्याचे निरीक्षण आहे.

कोणतेही दुचाकी किंवा चारचाकी वाहन चालविणाऱ्या वाहनचालकांसाठी वाहन परवाना बंधनकारक आहे. त्यासाठी पुणे प्रादेशिक परिवहन विभागाने (आरटीओ) संगमवाडी येथे शिकाऊ चाचणी विभाग स्थापन केला आहे. तो सहा महिने वैध असतो. त्यानंतर दुचाकीच्या पक्क्या परवान्याच्या चाचणीसाठी अर्जदाराला आळंदी रस्ता येथील आरटीओच्या कार्यालयात, तर चारचाकीच्या पक्क्या परवान्यासाठी भोसरीत 'इन्स्टिट्यूट ऑफ ड्रायव्हिंग ट्रेनिंग अँड रिसर्च' (आयडीटीआर) येथील चाचणी केंद्रात जावे लागते. शिकाऊ परवाना घरबसल्या ऑनलाइन परीक्षा देऊन काढता येतो. मात्र, पक्क्या परवान्यासाठी 'सीआयआरटी'ची संवेदक-आधारित कौशल्य चाचणी द्यावी लागते. यामध्ये इंग्रजी क्रमांक आठ, एच, तसेच तीव्र चढ आणि उतारावर वाहन नियंत्रित करण्यासाठी चालक पुरेसा कुशल आहे किंवा नाही, हे तपासले जाते. ही चाचणी संगणक प्रणालीवर आधारित असल्याने जरा जरी चूक झाली, तरी चालक अनुत्तीर्ण होतो. 'आरटीओ'ने दिलेल्या माहितीनुसार, सन २०२२-२३ या वर्षात एक लाख ३९ हजार पक्के परवाने देण्यात आले होते. सन २०२३-२४ मध्ये त्यात घट झाली आणि एक लाख ३२ हजार पक्के परवाने देण्यात आले, तर एप्रिल २०२४ पासून २२ नोव्हेंबर २०२४ या आठ महिन्यांत अवघे ८५ हजार पक्के परवाने मंजूर झाले आहेत. खरे तर एप्रिल २०२४ पासून २२ नोव्हेंबर २०२४ पर्यंत एक लाख ८३ हजार ५४७ जणांनी ऑनलाइन परीक्षा देऊन शिकाऊ परवाने प्राप्त केले. मात्र, परवाना पक्का करताना त्यातील केवळ ८५ हजार ५६० वाहनचालकच उत्तीर्ण झाल्याचे दिसते.

## अनधिकृत बांधकामांबाबत कारवाईच नाही

# पीएमआरडीए हद्दीत वाढली अनधिकृत बांधकामे!

## प्रशासनाचे दुर्लक्ष : दोन महिन्यांमध्ये कारवाई झालीच नाही

। पिंपरी-चिंचवड ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या (पीएमआरडीए) हद्दीत अनधिकृत बांधकामे वाढली आहेत. या बांधकामांवर नियंत्रण ठेवणे पीएमआरडीए प्रशासनाला जड जात आहे. 6 अनधिकृत बांधकामांबाबत दाखल केलेल्या गुन्ह्यांव्यतिरिक्त गेल्या दोन महिन्यांमध्ये अनधिकृत बांधकामांबाबत अन्य कारवाईच झालेली नाही.**




रस्ते, पदपथ, जलवाहिन्या, लोहमार्ग यांना अडथळा ठरणारी अनधिकृत बांधकामे वगळता अन्य बांधकामांवर कारवाई करण्यास सर्वोच्च न्यायालयाने स्थगिती दिलेली होती. त्याचप्रमाणे, राज्यामध्ये विधानसभा निवडणुकांची धामधुम सुरु होती. त्यामुळे अनधिकृत बांधकामावरील कारवाई थंडावली होती.

### सर्वोच्च न्यायालयाच्या निकालाचा संदर्भ

उत्तर प्रदेश येथे 2019 मध्ये बुलडोझरच्या साहाय्याने काही घरे पाडण्यात आली होती. त्यातील एका बाधिताने या विरोधात सर्वोच्च न्यायालयात याचिका दाखल केली होती. त्यांच्या या याचिकेवर 17 सप्टेंबरला सुनावणी झाली. यासंदर्भात लवकरच मार्गदर्शक तत्त्वे घोषित करणार आहे. तोपर्यंत कारवाई करु नका, असे न्यायालयाने त्या प्रसंगी आदेशाद्वारे स्पष्ट केले. मात्र, ज्यांनी सार्वजनिक रस्ते, रेल्वे रुळ, तलाव आणि इतर सरकारी मालमत्ता यांच्यावर अतिक्रमण केले असेल तर त्यांना नियम लागू राहणार नाही. ती मोकळी करता येतील, असेही न्यायालयाने म्हटले होते. या निकालाचा संदर्भ घेऊन पीएमआरडीएकडून अनधिकृत बांधकामांवरील कारवाई थांबविली होती. दरम्यान, अनधिकृत बांधकामांवरील कारवाईचा स्थगिती आदेश 13 नोव्हेंबरला मागे घेण्यात आला आहे.

### विधानसभा निवडणुकीचेही कारण

राज्यामध्ये 15 ऑक्टोबरपासून विधानसभा निवडणुकांची आचारसंहिता सुरु झाली. 20 नोव्हेंबरला मतदान तर, 23 नोव्हेंबरला मतमोजणी झाली. म्हणजे जवळपास निवडणुकांमध्ये सव्वा महिन्यांचा कालावधी गेला. निवडणुकांसाठी पीएमआरडीएचे अधिकारी नियुक्त करण्यात आलेले होते. त्यामुळे सर्वोच्च न्यायालयाने स्थगिती आदेश मागे घेतल्यानंतरही पीएमआरडीएकडून अनधिकृत बांधकामांवर कारवाई होऊ शकलेली नाही.

### अनधिकृत बांधकामांच्या विरोधात गुन्हे

पीएमआरडीएकडून ऑक्टोबर महिन्यापासून अनधिकृत बांधकामांच्या विरोधात गुन्हे दाखल करण्याची कारवाई सुरू करण्यात आली आहे. हिंजवडी आणि मांजरी (ता. हवेली) येथील प्रत्येकी एका अनधिकृत बांधकामाच्या विरोधात, लोणीकंद (ता. हवेली) येथील 5, तर, गहुंजे (ता. मावळ) येथील एका अनधिकृत बांधकामाच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे, अशी माहिती पीएमआरडीए अधिकाऱ्यांकडून देण्यात आली.

### नव्यानेही अनधिकृत बांधकामे सुरु

पीएमआरडीएच्या हद्दीत दौंड, भोर, हवेली, खेड, मावळ, मुळशी, शिरूर, पुरंदर तालुक्यातील आठशेपेक्षा अधिक गावांचा समावेश आहे. पीएमआरडीए हद्दीत गेल्या तीन वर्षांच्या कालावधीत सुमारे तीन हजारांपेक्षा अधिक अनधिकृत बांधकामे झालेली आहेत. पीएमआरडीएने यापूर्वी जाहीर केलेल्या आकडेवारीनुसार ही माहिती समोर आली आहे. तथापि, पीएमआरडीए प्रशासनाकडून याबाबत सर्वेक्षण झालेले नाही. त्यामुळे त्याबाबतचा निश्चित आकडा नसल्याचे अधिकारी सांगत आहे. दरम्यान, पीएमआरडीए हद्दीत सध्या नव्याने अनेक अनधिकृत बांधकामे होत आहेत. या अनधिकृत बांधकामांना थांबविण्यात पीएमआरडीए प्रशासनाला अपयश येत आहे. त्याचप्रमाणे, या बांधकामांवरील कारवाईसाठी पीएमआरडीएकडे मनुष्यबळ देखील तुटपुंजे आहे.

---

## आ. महेश लांडगे यांचे वाढदिवस 'सेलिब्रेशन' होणार नाही!

## भाजपाचे माजी प्रसिद्धीप्रमुख संजय पटनी यांची माहिती

। पिंपरी । प्रतिनिधी : महाईन्यूज

**लांडेवाडी, भोसरी येथील हिरामण वसंतराव गोडसे (वय-७६) यांचे नुकतेच निधन झाले. स्व. गोडसे हे आमदार महेश लांडगे यांचे सासरे आहेत. त्यामुळे यावर्षी वाढदिवस 'सेलिब्रेशन' होणार नाही. याची भाजपा आणि महायुतीच्या पदाधिकारी, सहकारी आणि हितचिंतकांना नोंद घ्यावी, अशी माहिती भाजपाचे माजी प्रसिद्धीप्रमुख संजय पटनी यांनी दिली.**




### शिवांजली सखी मंचच्या पुजा लांडगे यांना पितृशोक

### दोन जीवलग सहकाऱ्यांचेही निधनामुळे शोककळा

> आमदार महेश लांडगे यांचे सासरे गोडसे आणि लांडगे कुटुंबियांतील मार्गदर्शक स्व. हिरामण गोडसे यांचे नुकतेच निधन झाले आहे. तसेच, आमदार लांडगे यांचे दोन सहकारी स्व. दिपक पवार आणि स्व. दिपक नायर यांचा आकस्मिक मृत्यू झाला आहे. त्यामुळे आमदार लांडगे यांचा वाढदिवस आनंदोत्सव किंवा अभिष्ठचिंतन सोहळा होणार नाही. सर्व पक्षीय सहकारी, मित्र परिवार यांनी शुभेच्छा कार्यक्रम ठेवू नये, असे आवाहन करीत आहोत.
>
> – संजय पटनी, मा. प्रसिद्धी प्रमुख, भाजपा.

विधानसभा निवडणुकीत आमदार महेश लांडगे यांनी भोसरी विधानसभा मतदार संघातून विजयाची 'हॅट्रिक' केली. त्यामुळे भाजपा महायुतीच्या कार्यकर्त्यांमध्ये आणि लांडगे यांच्या मित्र परिवारामध्ये उत्साह आणि आनंदाचे वातावरण आहे.

प्रतिवर्षी दि. २७ नोव्हेंबर रोजी आमदार लांडगे यांचा वाढदिवस थाटामाटात साजरा केला जातो. भोसरी येथील गावजत्रा मैदानावर भव्य अभिष्ठचिंतन सोहळा होतो. मात्र, यावर्षी आमदार लांडगे यांचे सासरे हिरामण गोडसे यांचे निधन झाले आहे. शिवांजली सखी मंचच्या सर्वेसर्वा पुजा लांडगे यांचे ते वडील होत. त्यामुळे लांडगे व गोडसे कुटुंबियांवर शोककळा पसरली आहे.

तसेच, आमदार महेश लांडगे यांचा अत्यंत विश्वासू आणि जुना सहकारी दिपक पवार यांचे आकस्मिक निधन झाले आहे. निगडी येथील दिपक नायर यांचे हदयविकाराच्या झटक्याने ऐन निवडणुकीच्या काळात निधन झाले आहे.

तसेच, भोसरी येथील संदीप भुजबळ यांचेही निधन झाले आहे. त्यामुळे यावर्षी वाढदिवस साजरा न करण्यात येणार नाही.

# विविध नात्यांची वीण जपताना




**समाजात जीवन जगत असताना प्रत्येक गोष्टीत राजकारण असते. राजकारण अगदी आपल्या घरातून आपल्या अप्तांपासून सुरू होते. आपल्या संबंधित असणाऱ्या व्यक्तींनाच अर्थात आपले नातलग , आपले मित्र, आपल्या परिचयातील व्यक्ती यांनाच आपल्याशी स्पर्धा करायची असते. आपल्या पुढे जायचे असते. आपल्याला त्रास द्यायचा असतो. आपला हेवा करणारे आणि आपल्यावर जळणारे आपलेच असतात.**



आपलीच माणसं आपल्या आयुष्याला पुरेल अशी विविध अनुभवांची शिदोरी देत असतात. या प्रवासात अनेक नाती आपल्यासोबत येतात. या नात्यांच्या अनेक भूमिका आपण तयार करीत जातो आणि जगत जातो. आयुष्य पुढे पुढे प्रवास करत असताना प्रवासात येणारी माणसं नव्या नात्याची गुंफण घेऊन येतात. काही नाती खुजी असतात. या प्रवासात ही खुजी नाती सुटत जातात. परंतु काही नात्यांची विण अतिशय घट्ट असते जी कधीच सुटत नाही. ही विण कधी कधी सैल होते मात्र तुटत नाही. या सर्वांमध्ये महत्वाची असते ती भूमिका. लहान मोठेपणाची भूमिका, सुख दुःखात वावरण्याची भूमिका, संकटात सावरण्याची भूमिका, माणसं कमावण्याची भूमिका, नाती जोडण्याची आणि तोडण्याचीही भूमिका. काही नाती आयुष्यात येतात जी पुरेपूर सुखाने बरबटलेल्या भिंतीसारखी असतात. पण वरवर सुखाच्या बरबटण्याने वात्सल्याचा ओलावा कसा मिळेल ना? कामापुरते वात्सल्य असून काय उपयोग? नाती तर आयुष्याच्या प्रवासात चढउतार झेलणारी असावी ना? बरेचदा असं लक्षात येतं की आपण अनेकांसाठी सत्कृत्य करत राहतो. प्रवाहात येणाऱ्या प्रत्येकाला आपल्या सोबत घेऊन चालत राहतो. सहकार्यवृत्ती हा आपला स्वभाव असल्याने आणि हळवेपणा आपल्या रक्तात असल्याने कदाचित ही वृत्ती आपल्याला येत असावी. परंतु एखादेवेळी

आपण आपल्यासाठीच आपल्या प्रवासात बदल घडवून आणले की या आपल्या आप्त, मित्र आणि परिचयातील लोकांच्या पोटात दुखायला लागते. आणि यांचं राजकारण जोम धरायला लागतं. किती विचित्र आहे ना? आपल्याला वाटतं की अस्सल राजकारण केवळ राजकारण्यांमध्येच होत असतं परंतु अत्युच्च राजकारण आपल्याच जवळच्या माणसांत केल्या जातं. किंबहुना घडवून आणल्या जातं. पुढे जाणारी, विरोध करणारी आणि मतस्वातंत्र्य असणारी माणसं नको असतात कोणालाच. अगदी राजकारणात सुद्धा नकोच असतात. गप्प राहून ऐकणारी माणसं. हो ला हो लावणारी आणि मेंढरांसारखी पुढाऱ्यांच्या मागे पळत सुटणारी माणसं सर्वांना हवी असतात. असेच अगदी राजकारणाचे आहे. तेथेही आपापसांत खटके उडतात. आपल्या जवळचे म्हणवणारे कधी दुसऱ्याचे होऊन जातात कळत नाही. कुठल्या गोष्टीवर भरवसा करावा? असा प्रश्न निर्माण होतो. सध्या सर्वत्र चर्चा यंदाच्या निवडणुकीची आहे. जोमाने निवडून आलेली महायुती सर्वांना आश्चर्याचा धक्का देणारी ठरली. परंतु समकाळ हा स्पर्धेचा काळ आहे. याप्रमाणे ही निवडणूक सुद्धा एक प्रकारची स्पर्धा ठरली. स्पर्धेत जिंकणे हरणे आलेच. त्याप्रमाणे निकाल लागला की आपण वादावादीचे राजकारण करण्यात काय अर्थ? निवडणूक झाली . कामापुरते रामायण झाले. लोकांना पुढे काही मिळो न मिळो आता काय मिळाले याचे फार कौतुक. लाडकी बहिण योजना यावर भारी ठरल्याची घोषणा पण काही लोकांकडून केल्या गेली. एक - धागा - एक - गट - एक - मत अशी निती झाली. परंतु निवडणुकीमागे आणखी काय काय आणि कोणाकोणाचे कष्ट असतात ? कुठल्या नियोजनाने हे यश साध्य होते याची गोळाबेरीज आपण करत नाही. नाही केल्यास काही हरकत देखील नाही. परंतु आपल्या समाजाच्या हितावह योजनांची आखणी कशी व्हावी या लोकशाहीच्या अधिकाराचा उपयोग मात्र आपण केला पाहिजे. आपण सरकारला जाब विचारण्यापासून ते आपल्याला समाजात काय बदल हवेत इथपर्यंतचे सर्व निवेदन आपल्या नेत्यांपर्यंत पोहचवले पाहिजे. कोणी यात अडचणीचे ठरत असेल तर त्याला आपण पार करून जाणे महत्वाचे आहे. राजकारणाच्या खेळी चालत होत्या, चालत राहतील.

## प्रासंगिक »

### ठाकरे + ठाकरे

***'वाघ' म्हटले तरी खाणार आणि वाघ्या म्हटले तरी खाणार हेच होणार असेल तर ठाकरे बंधूंस आता तरी शहाणपण येऊन तशी कृती त्यांच्या हातून व्हायला हवी...***

दिल्लीतील तख्तास आव्हान ठरणाऱ्या महाराष्ट्री नेतृत्वाचा बंदोबस्त करण्यासाठी येथील नेत्यांच्या आप्तेष्टांनाच हत्यार म्हणून वापरण्याचा प्रयोग मोगलाईपासून सुरू आहे. छत्रपती शिवाजी महाराजांना स्वकीयांविरोधात किती रक्त आटवावे लागले ते नव्याने सांगण्याची गरज नाही. पुढे इंग्रजांनी हाच 'फोडा व झोडा' मार्ग अधिक रुंद केला. आज मोगलाई नाही आणि इंग्रजही येथून गाशा गुंडाळून मायदेशी गेले. या वेळी महाराष्ट्र आणि झारखंड या दोन राज्यांच्या निवडणुका एकाच वेळी झाल्या. त्यातील 'लाडकी बहीण' योजनेच्या साधर्म्याचा मुद्दा 'उजव्यांचे समाजवादी रक्षाबंधन' या संपादकीयात (२५ नोव्हेंबर) चर्चिला गेला. आज या निवडणुकीतील फरकाच्या मुद्द्याविषयी. झारखंडमधे 'झारखंड मुक्ती मोर्चा' या अगदी स्थानिक पक्षाने भाजपच्या बलदंड आव्हानास झुगारून सत्ता आपल्या हाती राखली.

महाराष्ट्रात मराठा व ओबीसी आरक्षणावरून वातावरण खूप तापले होते. सरकार देखील या तापलेल्या परिस्थितीत तेल ओतून आग भडकवण्याचा प्रयत्न करत होते. त्यामुळे महाराष्ट्रात मराठा विरुद्ध ओबीसी असा संघर्ष उभा होतो की काय अशी भीती निर्माण झाली होती.

# आपली झोपडी शाबूत राखा...!

यासोबतच दिनांक १ ऑगस्ट, २०२४ रोजी सर्वोच्च न्यायालयाने अनुसूचित जाती जमाती प्रवर्गातील आरक्षणात उपवर्गीकरण करण्याचा आणि क्रिमिलेयर लागू करण्याचा राज्यांना अधिकार आहे असा आरक्षणावर दूरगामी परिणाम करणारा निर्णय देऊन देशातील आरक्षणधारी वर्गात खळबळ माजवून दिली. त्यामुळे अनुसूचित जाती व जमाती मधील लोकं अस्वस्थ झाली. परिणामी प्रस्थापित पक्षांनी या सैरावैरा धावत असलेल्या समाजाला संविधान व आरक्षण आम्ही वाचवू अशा थापा देऊन भुलविले. आरक्षण हा महाराष्ट्रात कळीचा मुद्दा राहील असे वाटत होते. पण त्याची धार कमी करण्यात सत्ताधारी काही प्रमाणात यशस्वी तर झालेच पण यासोबतच त्यांनी मराठा विरुद्ध ओबीसी आणि अनुसूचित जाती जमाती प्रवर्गातील जातीजातींमध्ये दरार निर्माण करून फूट पडण्याचा डावही साधला. कारण आमच्यातील काही लोकं फारच कच्चे, हलक्या कानाचे आणि गुलामी स्वीकारून लाचारीचे




जीवन जगण्यात धन्यता मानणारे तर आहेतच पण त्यांच्यात वैचारिकतेचाही अभाव आहे. त्यामुळे ते आपापसात भांडून दुसऱ्याच्या दावणीला बांधले जाण्यात स्वतःला धन्य समजतात. देशात ओबीसी आणि अनुसूचित जाती जमाती मध्ये हजारों जाती आहेत. मात्र या सर्व जातींना एकसंघ करण्यासाठी महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी त्यांचे प्रवर्ग करून त्यांच्यात आपण एक आहों ही भावना दृढ करण्याचा प्रयत्न संविधानाच्या माध्यमातून यशस्वी केला होता. मात्र आता सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या निर्णयामुळे प्रस्थापितांच्या राजकीय पक्षांना पुन्हा एकदा जातीवाद वाढविण्याचा व फोडा आणि झोडा या नीतीचा अवलंब करण्याची संधी मिळाली हे निश्चित. आज ओबीसी, अनुसूचित जाती व जमाती प्रवर्गातील काही जातींना असे वाटते की, प्रस्थापित पक्षातील कोणता तरी पक्ष आपले हित करेल म्हणून ते वेगवेगळ्या पक्षात सामील झाले. मात्र ते विसरले की, हे सगळे पक्ष फक्त आपली गठ्ठा मते पदरात पाडून केवळ सत्तेसाठी आपला वापर करतील, त्यासाठी एखादा तुकडाही चघळण्यासाठी आपल्या समोर टाकतील पण समाजाचे हित किंवा सर्वांगीण विकास व्हावा यासाठी काहीच करणार नाहीत. फक्त आपल्याला वेगवेगळ्या भूलथापा देऊन झुलवत ठेवतील. कारण ते पक्ष भांडवलदार, जमीनदार, जहागीरदार, श्रीमंत लोकांचे आहेत. त्यामुळे ते त्यांच्या हितासाठी आहेत. बहुजन मागास समाजाच्या हितासाठी नाहीत. पण अविचारीपणाने आमच्यातीलच लोकं *"कुऱ्हाडीचा दांडा या पार्श्वभूमीवर डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे " *दुसऱ्याच्या हवेलीत शिरणे मोठा मूर्खपणा आहे, आपली झोपडी शाबूत राखा.

## ।। अभंगवाणी ।।



आजिवरी तुम्हां आम्हां नेणपण ।
कौतुकें खेळणें संग होता ॥१॥

आतां अनावर जालें अगुणाची ।
करूं नये तें चि करीं सुखें ॥२॥

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे- पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे- 411018 येथे पुणे विभागीय कार्यालयामधून प्रसिद्ध केले आहे. एमएसएमई नोंदणी क्रमांक : MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.
**कार्यकारी संपादक : वैष्णव जाधव । मुख्य कार्यकारी संपादक : सुनील आढाव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) विशेष सूचना: हा अंक कोणत्याची प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

# मुख्यमंत्री शिंदेंचा राजीनामा!

## नव्या सरकारच्या स्थापनेच्या घडामोडींना वेग

। मुंबई ।

**वृत्तसंस्था : महाईन्यूज**

**मंगळवारी (दि. २६ नोव्हेंबर) राज्य विधानसभेची मुदत संपत आहे. त्यामुळे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे (EKNATH SHINDE RESIGNS) यांनी आज आपल्या पदाचा आणि ओघानेच सरकारचा राजीनामा राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन यांना सादर केला. त्याचवेळी नव्या सरकारचा शपथविधी होईपर्यंत राज्यपाल शिंदे यांना काळजीवाहू मुख्यमंत्री म्हणून राज्य कारभार पाहण्यास सांगण्यात आले आहे.**



मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आज सकाळी राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन यांची राजभवनावर भेट घेऊन मुख्यमंत्रीपदाचा राजीनामा दिला. राज्यपालांनी हा राजीनामा स्वीकारून नवीन मुख्यमंत्र्यांची नियुक्ती होईपर्यंत शिंदे यांची काळजीवाहू मुख्यमंत्री म्हणून नियुक्ती करत असल्याचे पत्र त्यांना सुपूर्द केले. यावेळी देवेंद्र फडणवीस, अजित पवार, दीपक केसरकर, दादाजी भुसे आणि चंद्रकांत रघुवंशी हेदेखील उपस्थित होते. दरम्यान, राजभवनावरील ही औपचारिकता पूर्ण झाल्यानंतर तिन्ही पक्षांची संयुक्त बैठक होणार असल्याचे समजते.दरम्यान, भाजप नेते राहुल नार्वेकर यांनी आज सकाळी बोलताना म्हटले होते की,"...आज विधानसभेची मुदत संपत आहे. त्यांनी (मुख्यमंत्री शिंदे) आज राजीनामा दिल्यास, त्यांना नवीन सरकार स्थापन होईपर्यंत काळजीवाहू मुख्यमंत्री म्हणून राज्य कारभार पाहण्याची विनंती केली जाईल. तिन्ही पक्षाचे नेते, आमचे संसदीय मंडळ मुख्यमंत्री पदाबाबत निर्णय घेतील आणि लवकरच महाराष्ट्रात सरकार स्थापन होईल." महायुतील भाजपाला 132 जागा मिळाल्यानंतर महाविकास आघाडीला विरोधी पक्षनेतेपददेखील मिळू शकत नाही, अशी स्थिती आहे. दणदणीत विजय मिळाल्यानंतर मुख्यमंत्री पद देवेंद्र फडणवीस यांना मिळावं, अशी भाजपा नेत्यांसह कार्यकर्त्यांमधून मागणी होत आहे. देवेंद्र फडणवीस यांनी सोमवारी त्यांच्या सागर बंगल्यावर नवनिर्वाचित आमदारांची भेट घेतली. त्यानंतर ते दिल्लीला रवाना झाले. विधानसभा निवडणुकीनंतर भाजपानं विधिमंडळ पक्षाचे गटनेते, मुख्य प्रतोद आणि प्रतोद यांच्या निवडीसाठी नवनिर्वाचित आमदारांची बैठक बोलाविलेली नाही. मात्र, शिवसेनेचे विधिमंडळातील गटनेते म्हणून मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि राष्ट्रवादीचे विधिमंडळातील गटनेते म्हणून उपमुख्यमंत्री अजित पवार यांची महायुतीमधील घटकपक्षांनी निवड केली.भाजपच्या एका ज्येष्ठ नेत्यानं सांगितले की," फडणवीस यांना मुख्यमंत्री करावे, अशी केवळ भाजपाचे आमदार आणि पदाधिकाऱ्यांची नाही, तर राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचीदेखील इच्छा आहे. वसंतराव नाईक यांच्यानंतर पाच वर्षांचा कार्यकाळ पूर्ण करणारे देवेंद्र फडणवीस हे दुसरे मुख्यमंत्री आहेत. जून 2022 मध्ये एकनाथ शिंदे यांची मुख्यमंत्रिपदी नियुक्ती झाल्यानंतर, फडणवीस यांनी पक्षादेशानुसार उपमुख्यमंत्री म्हणून जबाबदारी पार पाडली. भाजपानं 2019 मध्ये विधानसभा निवडणुकीत 122 जागा जिंकल्या होत्या. यावेळी भाजपानं 132 जागा जिंकल्या आहेत. हे फडणवीस यांच्या नेतृत्वामुळे शक्य झालं. केंद्रीय नेतृत्वाकडून देवेंद्र फडणवीस यांच्या मुख्यमंत्री पदाबाबत लवकरच हिरवा कंदील दिला जाईल अशी अपेक्षा आहे."सरीकडं महायुतीच्या निवडणुकीतील यशाचं श्रेय देत एकनाथ शिंदे यांना मुख्यमंत्रिपदी म्हणून पुन्हा संधी द्यावी, अशी शिवसेनेतून जोरदार मागणी होत आहे. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी मध्यरात्री एक्स मीडियावर पोस्ट करत गर्दी न करण्याचं आवाहन केलं. त्यांनी पोस्टमध्ये म्हटले," तुमच्या या प्रेमासाठी मी अत्यंत मनापासून ऋणी आहे. मात्र अशा पद्धतीने माझ्या समर्थनार्थ कुणीही एकत्र येऊ नये, असे आवाहन मी करतो. नम्र विनंती की शिवसेनेच्या कार्यकर्त्यांनी वर्षा निवासस्थान किंवा अन्य कुठेही एकत्र जमू नये. समर्थ आणि समृद्ध महाराष्ट्रासाठी महायुती भक्कम होती आहे. यापुढेही भक्कमच राहील."मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आज सकाळी राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन यांची राजभवनावर भेट घेऊन मुख्यमंत्रीपदाचा राजीनामा दिला.

### महाराष्ट्रासाठी महायुती भक्कम

राज्यपालांनी हा राजीनामा स्वीकारून नवीन मुख्यमंत्र्यांची नियुक्ती होईपर्यंत शिंदे यांची काळजीवाहू मुख्यमंत्री म्हणून नियुक्ती करत असल्याचे पत्र त्यांना सुपूर्द केले. यावेळी देवेंद्र फडणवीस, अजित पवार, दीपक केसरकर, दादाजी भुसे आणि चंद्रकांत रघुवंशी हेदेखील उपस्थित होते. दरम्यान, राजभवनावरील ही औपचारिकता पूर्ण झाल्यानंतर तिन्ही पक्षांची संयुक्त बैठक होणार असल्याचे समजते.दरम्यान, भाजप नेते राहुल नार्वेकर यांनी आज सकाळी बोलताना म्हटले होते की,"...आज विधानसभेची मुदत संपत आहे. त्यांनी (मुख्यमंत्री शिंदे) आज राजीनामा दिल्यास, त्यांना नवीन सरकार स्थापन होईपर्यंत काळजीवाहू मुख्यमंत्री म्हणून राज्य कारभार पाहण्याची विनंती केली जाईल.

# मुख्यमंत्री पदासाठी महायुतीत खलबतं!

## मुख्यमंत्री पदासाठी देवेंद्र फडणवीस यांचं नाव भाजपाकडून पुढे

। मुंबई। प्रतिनिधी । महाईन्यूज।

**राज्यात विधानसभा निवडणुकीच्या निकालांमध्ये महायुतीला स्पष्ट बहुमत मिळालं आहे. त्यामुळे आगामी काळात महायुतीची सत्ता स्थापन होणार आहे. परंतु, महायुतीच्या सरकारमध्ये मुख्यमंत्री कोण असणार याबाबत खलबतं सुरू आहेत. काळजीवाहू मुख्यमंत्री एकनाथ शिंदे अडीच वर्षांच्या मुख्यमंत्री पदासाठी अडून बसल्याचं वृत्त आहे.**

तर, सर्वाधिक आमदार निवडून आल्याने भाजपाने देवेंद्र फडणवीस यांच्या नावावर मुख्यमंत्री पदासाठी शिक्कामोर्तब केलं आहे. यादरम्यान, राजकीय पक्षांच्या गाठीभेटी वाढल्या असून बैठक अन् चर्चांना जोर आला आहे. शिवसेना (एकनाथ शिंदे) पक्षाचे आमदार संजय शिरसाट यांनी आज देवेंद्र फडणवीस यांची भेट घेतली. या भेटीनंतर त्यांनी माध्यमांशी संवाद साधला आहे.राज्यात नव्या मुख्यमंत्री पदासाठी देवेंद्र फडणवीस यांचं नाव भाजपाकडून पुढे आलं आहे. तर, अजित पवारांनीही या नावाला अनुमोदन दिलं आहे. परंतु, महायुतीच्या विजयामागे एकनाथ शिंदेंचं मजबूत नेतृत्त्व



कारणीभूत असल्याने एकनाथ शिंदेंनीही मुख्यमंत्री पदाची मागणी केल्याची चर्चा आहे. महायुतीतील घटक पक्षातील नेत्यांमध्ये चर्चा सुरू आहे. यादरम्यान, संजय शिरसाटांनी देवेंद्र फडणवीसांची भेट घेतली. मात्र, ही भेट राजकीय भेट नसून मैत्रीपूर्ण भेट होती, असं संजय शिरसाट म्हणाले. संजय शिरसाट म्हणाले, "निवडून आल्यानंतर मी त्यांना भेटायला गेलो नव्हतो. दोन दिवसांपासून पक्षाच्या बैठकी चालू होत्या. आज निवांत वेळ होता.

### लॉबिंग असा अर्थ घेऊ नका

महायुतीच्या सरकारमध्ये मुख्यमंत्री कोण असणार याबाबत खलबतं सुरू आहेत. काळजीवाहू मुख्यमंत्री एकनाथ शिंदे अडीच वर्षांच्या मुख्यमंत्री पदासाठी अडून बसल्याचं वृत्त आहे. चहा प्यायलो. गप्पा मारल्या. कोणतीही राजकीय चर्चा केली नाही. देवेंद्र फडणवीस आणि एकनाथ शिंदेंची एवढी मजबूत पकड आहे की त्यांच्यासाठी लॉबिंग करण्याकरता आमच्यासारख्यांची गरज नाही." "कोणी आमदार जाऊन लॉबिंग करेल आणि सांगेल असं होत नाही. वरिष्ठ पातळीवर निर्णय होत असतात. त्यामुळे कोणी कोणाला भेटलं तर लॉबिंग असा अर्थ घेऊ नका, असंही ते पुढे म्हणाले.


# संसदेवर ताबा मिळवण्याचा प्रयत्न!

## विरोधी पक्षांच्या संसदेच्या कामकाजामध्ये अडथळा

। नवी दिल्ली ।

**वृत्तसंस्था : महाईन्यूज**

**देशातील जनतेकडून ८०-९० वेळा नाकारले गेलेले विरोधक स्वत:च्या राजकीय लाभासाठी हुल्लडबाजी करून संसदेवर ताबा मिळवण्याचा प्रयत्न करत आहेत, असा आरोप पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सोमवारी केला. संसदेमध्ये विरोधी पक्ष काय काम करतो हे लोक पाहत असतात. त्यानंतर मग, वेळ आली की लोक त्यांना धडा शिकवतात, अशा शब्दांत पंतप्रधानांनी टीकास्त्र सोडले.**



संसदेच्या हिवाळी अधिवेशनाला सोमवारी सुरुवात झाली. दोन्ही सभागृहांचे कामकाज चालू होण्यापूर्वी संसदेच्या आवारात मोदींनी पत्रकारांशी संवाद साधला. यावेळी त्यांनी विरोधी पक्षांच्या संसदेच्या कामकाजामध्ये अडथळा आणण्याच्या प्रवृत्तीवर तीव्र नाराजी व्यक्त केली. अदानी समूहाचे लाचखोरी प्रकरण, मणिपूरमधील हिंसाचार आदी अनेक महत्त्वाचे मुद्दे सभागृहाचे कामकाज सुरू होताच मांडले जातील, असे काँग्रेसच्या नेत्यांनी रविवारी झालेल्या सर्वपक्षीय बैठकीमध्येच स्पष्ट केले होते. विरोधकांच्या या आक्रमक भूमिकेचा अंदाज घेत मोदींनी विरोधकांना आधीच खडेबोल सुनावले.लोकसभा निवडणुकीमध्ये जनतेने ‘एनडीए’ला बहुमत मिळवून दिले. विधानसभा निवडणुकीतही पाहायला मिळाला आहे. दोन्ही राज्यांमध्ये भाजप आघाडीला प्रचंड बहुमत मिळाले. लोकांनी विरोधकांना नाकारले आहे. त्यामुळे लोकांच्या आशा-आकांक्षांच्या पूर्तीसाठी विरोधकांनी कष्ट करण्याची गरज आहे. संसदेमध्येही महत्त्वाच्या मुद्द्यावर सविस्तर चर्चा झाली पाहिजे, त्यासाठी विरोधकांनीही चर्चेत सहभागी झाले पाहिजे, असे मोदी म्हणाले. विरोधकांमधील काही सदस्यांची वर्तणूक योग्य असून कामकाज सुरळीतपणे झाले पाहिजे असे त्यांनाही वाटते. संसदेमध्ये नव्या सदस्यांना बोलण्याची संधी दिली जात नाही. जुन्या सदस्यांनी नव्या पिढीला घडवले पाहिजे, त्यांच्याकडे नव्या कल्पना असू शकतात म्हणूनच त्यांना बोलण्यासाठी प्रवृत्त केले पाहिजे, असा सल्ला मोदींनी विरोधकांना दिला.जुन्या संसद भवनातील मध्यवर्ती सभागृहात मंगळवारी होणाऱ्या ७५ व्या संविधान दिन सोहळ्याचे नेतृत्व राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू करणार असल्याचे सरकारने सोमवारी जाहीर केले. उपराष्ट्रपती जगदीप धनखड, पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि लोकसभेचे अध्यक्ष ओम बिर्ला हे देखील या सोहळ्यात सहभागी होणार आहेत. दरम्यान, ‘इंडिया’ आघाडीने विरोधी पक्षांच्या नेत्यांना संविधान दिनाच्या समारंभात बोलू देण्याची विनंती लोकसभा अध्यक्ष ओम बिर्ला यांच्याकडे पत्राद्वारे केली आहे. संसदेच्या हिवाळी अधिवेशनाला सोमवारी सुरुवात झाली. दोन्ही सभागृहांचे कामकाज चालू होण्यापूर्वी संसदेच्या आवारात मोदींनी पत्रकारांशी संवाद साधला. यावेळी त्यांनी विरोधी पक्षांच्या संसदेच्या कामकाजामध्ये अडथळा आणण्याच्या प्रवृत्तीवर तीव्र नाराजी व्यक्त केली. अदानी समूहाचे लाचखोरी प्रकरण, मणिपूरमधील हिंसाचार आदी अनेक महत्त्वाचे मुद्दे सभागृहाचे कामकाज सुरू होताच मांडले जातील, असे काँग्रेसच्या नेत्यांनी रविवारी झालेल्या सर्वपक्षीय बैठकीमध्येच स्पष्ट केले होते. विरोधकांच्या या आक्रमक भूमिकेचा अंदाज घेत मोदींनी विरोधकांना आधीच खडेबोल सुनावले.लोकसभा निवडणुकीमध्ये जनतेने ‘एनडीए’ला बहुमत मिळवून दिले. हाच कल हरियाणा आणि महाराष्ट्रातील विधानसभा निवडणुकीतही पाहायला मिळाला आहे. दोन्ही राज्यांमध्ये भाजप आघाडीला प्रचंड बहुमत मिळाले. लोकांनी विरोधकांना नाकारले आहे. त्यामुळे लोकांच्या आशा-आकांक्षांच्या पूर्तीसाठी विरोधकांनी कष्ट करण्याची गरज आहे. संसदेमध्येही महत्त्वाच्या मुद्द्यावर सविस्तर चर्चा झाली पाहिजे, त्यासाठी विरोधकांनीही चर्चेत सहभागी झाले पाहिजे, असे मोदी म्हणाले. विरोधकांमधील काही सदस्यांची वर्तणूक योग्य असून कामकाज सुरळीतपणे झाले पाहिजे.

### बिर्ला सोहळ्यात सहभागी होणार

असे त्यांनाही वाटते. संसदेमध्ये नव्या सदस्यांना बोलण्याची संधी दिली जात नाही. जुन्या सदस्यांनी नव्या पिढीला घडवले पाहिजे, त्यांच्याकडे नव्या कल्पना असू शकतात म्हणूनच त्यांना बोलण्यासाठी प्रवृत्त केले पाहिजे, असा सल्ला मोदींनी विरोधकांना दिला.जुन्या संसद भवनातील मध्यवर्ती सभागृहात मंगळवारी होणाऱ्या ७५ व्या संविधान दिन सोहळ्याचे नेतृत्व राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू करणार असल्याचे सरकारने सोमवारी जाहीर केले. उपराष्ट्रपती जगदीप धनखड, पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि लोकसभेचे अध्यक्ष ओम बिर्ला हे देखील या सोहळ्यात सहभागी होणार आहेत. दरम्यान, ‘इंडिया’ आघाडीने विरोधी पक्षांच्या नेत्यांना संविधान दिनाच्या समारंभात बोलू देण्याची विनंती लोकसभा अध्यक्ष ओम बिर्ला यांच्याकडे पत्राद्वारे केली आहे.

# राहुल गांधींचं नागरिकत्व रद्द होणार?

## केंद्र सरकार मोठा निर्णय घेण्याची शक्यता; सीबीआय चौकशीची मागणी

। नवी दिल्ली ।

**वृत्तसंस्था : महाईन्यूज**

**काँग्रेस नेते तथा लोकसभेतील विरोधी पक्षनेते खासदार राहुल गांधी यांच्या नागरिकत्वासंदर्भातील प्रकरणावर अलाहाबाद उच्च न्यायालयाच्या लखनऊ खंडपीठात सुनावणी पार पडली. राहुल गांधी यांच्या भारतीय नागरिकत्वावर प्रश्न उपस्थित करणारी एक याचिका न्यायालयात दाखल करण्यात आली होती.**



या याचिकेवर न्यायालयात सुनावणी झाली. यावेळी न्यायालयाने केंद्र सरकारला राहुल गांधी यांच्या नागरिकत्वाबाबत स्टेटस अहवाल १९ डिसेंबरपर्यंत सादर करण्याचे आदेश दिले आहेत. त्यामुळे आता केंद्रीय गृहमंत्रालय यावर काय निर्णय घेतं? याकडे अनेकांचं लक्ष लागलं आहे.

राहुल गांधी यांच्या नागरिकत्वाची केंद्रीय अन्वेषण ब्युरो (सीबीआय) चौकशी करण्याची मागणी एस विघ्नेश शिशिर यांनी केली होती. तसेच याबाबत त्यांनी न्यायालयात याचिका दाखल केली होती. याचिकाकर्त्याच्या म्हणण्यानुसार, राहुल गांधी याच्याकडे प्रत्यक्षात ब्रिटिश नागरिकत्व आहे.

तसेच एकापेक्षा जास्त देशांची नागरिकता असल्याचा दावा देखील याचिकाकर्त्याकडून करण्यात आला आहे. दरम्यान, राहुल गांधी यांच्या नागरिकत्वाला आव्हान देणारी याचिका २४ ऑक्टोबर रोजी हायकोर्टाच्या लखनऊ खंडपीठात सुनावणी झाली होती. त्यानंतर २५ नोव्हेंबर रोजी या प्रकरणाच्या सुनावणी झाली.

### केंद्र सरकार मोठा निर्णय

यावेळी भारताचे डेप्युटी सॉलिसिटर जनरल एसबी पांडे यांनी न्यायालयाला माहिती देताना सांगितलं की, या मुद्द्यावर याचिकाकर्त्यांने केलेले निवेदन केंद्र सरकारला प्राप्त झालेलं आहे. राहुल गांधी यांचे भारतीय नागरिकत्व रद्द करण्याची मागणी याचिकाकर्त्यांने न्यायलयात केली आहे. त्यामुळे मोठी खळबळ उडाली आहे. यासंदर्भातील वृत्त ‘बार अँड बेंच’ने दिलं आहे. आता राहुल गांधी यांच्या नागरिकत्वासंदर्भातील माहिती १९ डिसेंबरला केंद्र सरकारकडून न्यायालयात दिली जाणार आहे.

# अभिषेक बॉलीवूडमधून घेणार होता कायमची निवृत्ती

अभिनेता अभिषेक बच्चनने नुकत्याच एका मुलाखतीत त्याच्या संघर्षाच्या काळातील आठवणी शेअर केल्या आहेत. करिअरच्या सुरुवातीच्या टप्प्यात, जेव्हा त्याच्या अनेक चित्रपटांना अपयश आले आणि समीक्षकांकडून त्याची कामगिरी टीकेचा विषय बनली होती, तेव्हा अभिषेकने अभिनय क्षेत्र सोडण्याचा विचार केला होता. अशा कठीण वेळी त्याचे वडील आणि बॉलीवूडचे शहेनशाह अमिताभ बच्चन यांनी त्याला प्रोत्साहन दिले आणि एक मोलाचा सल्ला दिला. 'गालट्टा प्लस'ला दिलेल्या मुलाखतीत अभिषेक म्हणाला, "त्या काळात माझे अनेक चित्रपट चालले नाहीत, मी कोणाबरोबरही काम केले तरी त्याची पर्वा न करता समीक्षकांनी माझ्या कामगिरीवर टीका केली. मी त्या काळातील नामवंत दिग्दर्शकांबरोबर काम करून स्वतःची कामगिरी सुधारण्याचा प्रयत्न केला, पण माझ्या बाजूने काहीच चांगले घडत नव्हते."अभिषेकने पुढे सांगितले की, त्याच्या करिअरच्या संघर्षाच्या काळात त्याने वडिलांशी संवाद साधला. "मी माझ्या वडिलांना जाऊन म्हटलं, 'आपण चूक केली आहे, मी या क्षेत्रासाठी योग्य नाही. मी सर्व प्रयत्न करून पाहिले, पण काहीच होत नाही. मला वाटतं, मला प्रामाणिक



राहून हे स्वीकारावं लागेल की मी यासाठी पात्र नाही, मी काहीतरी दुसरं करण्याचा विचार करतो."'अभिषेकने सांगितले की, त्याचे वडील अमिताभ बच्चन यांनी त्याला आधार दिला आणि त्याचा आत्मविश्वास वाढवला. "ते म्हणाले, 'मी तुला एक वडील नव्हे, तर या क्षेत्रातील एक सीनियर म्हणून सांगतो आहे. तू अजून पूर्ण तयार नाहीस, तुझ्यात सुधारणा होत आहे, पण तुला अजून खूप मेहनत घ्यावी लागेल. तुझ्यात एक उत्तम अभिनेता दडलेला आहे. तो किती चांगल्या प्रकारे लोकांसमोर होईल, हे तुझ्या मेहनतीवर अवलंबून आहे. फक्त काम करत रहा, तुला जे चित्रपट मिळतील ते कर. काम केल्याशिवाय तुझं कौशल्य वाढणार नाही."अमिताभ यांच्या सल्ल्यानंतर अभिषेकने सहाय्यक भूमिका स्वीकारायला सुरुवात केली.

## अरिजितच्या मानधनाबाबत प्रसिद्ध रॅपरचा खुलासा

'चन्ना मेरेया', 'ओ माही', 'हमारी अधुरी कहानी', 'गलती से मिस्टेक' या आणि अशा अनेक गाण्यांनी तसेच आपल्या गोड गळ्याने अरिजित सिंहने सर्वांना मंत्रमुग्ध केलं आहे. त्याने आजवर आपल्या गाण्यांनी लाखो चाहत्यांची मने जिंकली आहेत. त्याच्या गाण्यांचे सर्वच जण नेहमी भरभरून कौतुक करतात. अरिजित त्याच्या गाण्यांसाठी किती मानधन घेत असेल असा प्रश्न तुम्हालाही कधी ना कधी पडला असेल. अशात आता एका प्रसिद्ध रॅपरने अरिजितच्या मानधनाबाबत एक खुलासा केला आहे.ऑनेस्टली सेइंग पॉडकास्टमध्ये नुकतेच रॅपर इक्का सिंह आणि रफ्तार या दोघांनी हजेरी लावली होती. यावेळी त्यांनी अरिजित त्याच्या अडचणी दूर कसा ठेवतो आणि आपल्या संपत्तीचा दिखावा करण्यापासून नेहमी कसा दूर राहतो याबद्दल सांगितलं.

## दियाचा प्रोजेक्ट काय ?



बॉलीवूडची प्रसिद्ध अभिनेत्री दिया मिर्झाचा नवा प्रोजेक्ट लवकरच प्रेक्षकांच्या भेटीस येणार आहे. या प्रोजेक्टमध्ये काही मराठी कलाकारांची वर्णी लागली आहे. या मराठी कलाकारांनी सोशल मीडियावर पोस्ट करून दियाच्या नव्या प्रोजेक्टची माहिती दिली आहे. दिया मिर्झाची 'पन्हं' या नावाची नवीन शॉर्ट फिल्म भेटीस येत आहे. या शॉर्ट फिल्मची दिया ही निर्माती असून यामध्ये बरेच मराठी कलाकार झळकणार आहे. यात 'महाराष्ट्राची हास्यजत्रा' फेम अभिनेता पृथ्वीक प्रताप पाहायला मिळणार आहे. यासंदर्भात त्याने सोशल मीडियावर पोस्ट शेअर केली. "हृदयाच्या कोपऱ्यातला अत्यंत लाडका प्रोजेक्ट..'पन्हं'", असं कॅप्शन लिहीत त्याने काही फोटो शेअर केले आहेत.याशिवाय पृथ्वीकसह अभिनेत्री सायली संजीव देखील दियाच्या आगामी प्रोजेक्टमध्ये दिसणार आहे. तिने देखील इन्स्टाग्राम स्टोरीवर या प्रोजेक्टसंबंधित पोस्ट शेअर केली आहे. "या प्रोजेक्टचा एक भाग होण्याचा मला खूप आनंद आहे," असं लिहून तिने एक फोटो शेअर केला आहे.पृथ्वीक प्रताप व सायली संजीवबरोबर अभिनेता सुहास शिरसाट देखील 'पन्हं' या शॉर्ट फिल्ममध्ये झळकणार आहे. यासंदर्भात सुहासने इन्स्टाग्राम स्टोरी शेअर केली आहे. "एका दमदार टीमबरोबर नवीन काम", असं लिहितं अभिनेत्याने क्लॅपचा फोटो शेअर केला आहे.दरम्यान, दिया मिर्झाची ही शॉर्ट फिल्म काय आहे?

## लाथ मारल्यामुळे वरुण भडकला

आयपीएलच्या हंगामाला नुकतीच सुरुवात झाली असून, रविवारी मुंबई इंडियन्स आणि गुजरात टायटन्सचा सामना पार पडला. सामन्यादरम्यान अचानक एक श्वान मैदानात घुसल्याने सगळ्यांची तारांबळ उडाली. पोलीस आणि इतर लोक त्या धावत्या श्वानाला पकडण्यासाठी पाय मधे टाकून त्याला अडविण्याचा प्रयत्न करत होते. हा व्हिडीओ सध्या सोशल मीडियावर प्रचंड व्हायरल होत आहे. या प्रकारामुळे बॉलीवूडमधील अनेक कलाकारांनी संताप व्यक्त केला आहे. मुंबई इंडियन्सचा कर्णधार हार्दिक पांड्या जेव्हा गोलंदाजीसाठी सज्ज झाला तेव्हा श्वान मैदानात घुसला. त्यामुळे सामना थोडा वेळ थांबविण्यात आला. हार्दिक पांड्याने कुत्र्याला आपल्याकडे बोलावले असता, स्टेडियममधील ग्राउंड स्टाफने पाठलाग करून, कुत्र्याला मैदानातून हाकलून दिले.'स्ट्रीट डॉग्स ऑफ बॉम्बे'च्या अधिकृत इन्स्टाग्राम पेजवर हा व्हिडीओ शेअर करण्यात आला होता. श्वानाला अथकपणे लाथ मारल्यामुळे आणि त्याचा पाठलाग केल्याबद्दल त्यांनी ग्राउंड स्टाफला फटकारले. हा व्हिडीओ आपल्या स्टोरीवर शेअर करीत, वरुण धवनने आपला संताप व्यक्त केला. "श्वान काही फुटबॉल नाही. श्वान कोणाला नुकसान पोहोचवत नाही किंवा तो चावतही नाही आहे. बेपर्वाईनं वागण्यापेक्षा याबाबत एक चांगला मार्ग योजणं आवश्यक आहे," अशा शब्दांत वरुणने श्वानाबरोबर गैरवर्तन करणाऱ्यांना फटकारले. सामन्यादरम्यानचा श्वानाचा हा व्हिडीओ सध्या सोशल मीडियावर धुमाकूळ घालत आहे.



## मी शाहरुख खानसमोर तासभर रडले होते : फराह

प्रसिद्ध कोरिओग्राफर व दिग्दर्शक फराह खान आणि शाहरुख खान खूप जवळचे मित्र आहेत. एका मुलाखतीत, फराहला ४० व्या वर्षी आयव्हीएफद्वारे गर्भधारणा झाली, होती. ती तीन बाळांना जन्म देणार आहे, ही आनंदाची बातमी कुटुंबाबाहेरच्या कुणाला दिली असेल तर तो शाहरुख पहिला होता, असा खुलासा फराहने केला आहे. 'ओम शांती ओम'चे शूटिंग करत असताना फराह गरोदर होती, त्यावेळी शाहरुख सेटवर खूप काळजी घ्यायचा, असं फराहने सांगितलं.नोव्हा आयव्हीएफ फर्टिलिटी यूट्यूब चॅनलला दिलेल्या मुलाखतीत फराहने सांगितलं की ती शूटच्या आधी आणि नंतर आयव्हीएफ उपचारांसाठी जायची. ते क्लिनिक सेटपासून एक तासाच्या अंतरावर होते. सुरुवातीला उपचारात खूप अडचणी येत होत्या, तेव्हा सेटवर परत येताना रडायचे, असं फराह म्हणाली."पहिल्या पाच-सहा महिन्यांत खूप त्रास झाला. मला खूपदा डॉक्टरांनी भूल दिली होती. एकदा डॉक्टरकडे गेल्यावर मला खात्री होती की मी गरोदर आहे, पण मला दवाखान्यातच मासिक पाळी आली. त्यानंतर बऱ्याचदा मी दवाखान्यातून शूटिंगला परत येईपर्यंत रडत असे. एके दिवशी मध्यरात्री मला डॉक्टरांचा फोन आला आणि सांगितलं की मी गरोदर नाही. आम्ही एक कॉमिक सीन शूट करत होतो. शाहरुखला कळालं की मला काहीतरी झालंय, कारण मी रडण्याच्या तयारीत होते. मग त्याने सर्वांना ब्रेक दिला आणि मला त्याच्या व्हॅनमध्ये नेलं, असं फराह म्हणाली. मी म्हणाले, 'मला तुला काहीतरी सांगायचं आहे'. त्याने माझ्याकडे पाहिलं आणि म्हणाला, 'तू गरोदर आहेस का?' आम्हाला दर्दे-ए-डिस्को गाण्याचं शूटिंग संपवायचं होतं आणि प्रत्येक वेळी तो शर्ट काढायचा तेव्हा मी त्याचं शर्ट वर फेकून देत असे. तो माझ्यासमोर

# लिलावात 'बिहारी बाबू' मालामाल!

## मुकेश कुमार; आकाश दीपवर लागली करोडोंची बोली

नवी दिल्ली । । वृत्तसंस्था

**आयपीएल 2025 लिलावात 'लाल ऑफ बिहार' मुकेश कुमार आणि आकाश दीपवर पैशांचा पाऊस पडला. लखनौने आकाश दीपला 8 कोटी रुपयांना विकत घेतले, तर दिल्लीने आरटीएमद्वारे 8 कोटी रुपये देऊन मुकेश कुमारला आपल्या संघात समाविष्ट केले. मुकेश कुमारसाठी बोली 2 कोटी रुपयांच्या मूळ किंमतीपासून सुरू झाली, सीएसकेने मुकेशला विकत घेण्यासाठी पहिली बोली लावली. पण यानंतर पंजाब किंग्जनेही बोली लावायला सुरुवात केली.**






मुकेश कुमारला विकत घेण्यासाठी सीएसके आणि पंजाबमध्ये चढाओढ पाहिला मिळाली. जेव्हा किंमत 6.50 कोटींवर पोहोचली तेव्हा चेन्नईने माघार घेतली. यानंतर दिल्ली कॅपिटल्सचा संघ मैदानात उतरला. दिल्लीने मुकेशसाठी आरटीएमचा वापर केला. ज्या अंतर्गत पंजाब किंग्जने मुकेशसाठी 8 कोटी रुपये निश्चित केले, जे दिल्लीने स्वीकारले आणि आरटीएमअंतर्गत, दिल्लीने मुकेश कुमारचा आपल्या संघात समावेश केला.मुकेश कुमार हा बिहारमधील गोपालगंज जिल्ह्यातील काकरकुंड गावचा रहिवासी आहे. बिहारमधून कोलकात्यात जाऊन मुकेशने आपला ठसा उमटवला. बंगालकडून देशांतर्गत क्रिकेट खेळून मुकेशने स्वत:ला सिद्ध केले. रिपोर्टनुसार, मुकेश कुमारचे वडील ऑटो चालवायचे.आत्तापर्यंत मुकेशने आयपीएलमध्ये 20 सामने खेळले असून यादरम्यान तो 29 च्या सरासरीने 24 विकेट्स घेण्यात यशस्वी ठरला आहे. 2024 च्या पहिल्या सत्रात मुकेश दिल्ली संघाचा खेळाडू होता. या मोसमात मुकेशने 10 सामन्यांत एकूण 17 विकेट्स घेण्यात यश मिळवले होते. आकाश दीप हा मूळचा बिहारच्या रोहतास जिल्ह्यातील शिवसागर ब्लॉकमधील बड्डी गावचा रहिवासी आहे. आकाश दीपने कसोटीत आपल्या गोलंदाजीने आपले कौशल्य दाखवून दिले आहे. यामुळेच लखनौने त्याला आयपीएल लिलावात 8 कोटी रुपयांना विकत घेतले आणि आपल्या संघात सामील केले. आकाश दीपने आयपीएल 2024 मध्ये फक्त एकच सामना खेळला असून एक विकेट घेण्यात त्याला यश आले आहे. याशिवाय आयपीएलमध्ये आकाश दीपने 8 सामने खेळून 7 विकेट्स आपल्या नावावर करण्यात यश मिळवले आहे. आकाश दीपने टी-20 मध्ये 49 विकेट्स घेतल्या आहेत. याशिवाय आकाशने 5 कसोटी सामने खेळले असून 10 विकेट्स घेतल्या आहेत.जेव्हा किंमत 6.50 कोटींवर पोहोचली तेव्हा चेन्नईने माघार घेतली. यानंतर दिल्ली कॅपिटल्सचा संघ मैदानात उतरला. दिल्लीने मुकेशसाठी आरटीएमचा वापर केला. ज्या अंतर्गत पंजाब किंग्जने मुकेशसाठी 8 कोटी रुपये निश्चित केले, जे दिल्लीने स्वीकारले आणि आरटीएमअंतर्गत, दिल्लीने मुकेश कुमारचा आपल्या संघात समावेश केला.मुकेश कुमार हा बिहारमधील गोपालगंज जिल्ह्यातील काकरकुंड गावचा रहिवासी आहे. बिहारमधून कोलकात्यात जाऊन मुकेशने आपला ठसा उमटवला. बंगालकडून देशांतर्गत क्रिकेट खेळून मुकेशने स्वत:ला सिद्ध केले. रिपोर्टनुसार, मुकेश कुमारचे वडील ऑटो चालवायचे. पण आता त्यांचा मुलगा भारतीय क्रिकेट संघाचा स्टार गोलंदाज ठरला आहे. आत्तापर्यंत मुकेशने आयपीएलमध्ये 20 सामने खेळले असून यादरम्यान तो 29 च्या सरासरीने 24 विकेट्स घेण्यात यशस्वी ठरला आहे. 2024 च्या पहिल्या सत्रात मुकेश दिल्ली संघाचा खेळाडू होता. या मोसमात मुकेशने 10 सामन्यांत एकूण 17 विकेट्स घेण्यात यश मिळवले होते. आकाश दीप हा मूळचा बिहारच्या रोहतास जिल्ह्यातील शिवसागर ब्लॉकमधील बड्डी गावचा रहिवासी आहे. आकाश दीपने कसोटीत आपल्या गोलंदाजीने आपले कौशल्य दाखवून दिले आहे. यामुळेच लखनौने त्याला आयपीएल लिलावात 8 कोटी रुपयांना विकत घेतले आणि आपल्या संघात सामील केले. आकाश दीपने आयपीएल 2024 मध्ये फक्त एकच सामना खेळला असून एक विकेट घेण्यात त्याला यश आले आहे.

### आकाश दीपवर पैशांचा पाऊस

याशिवाय आयपीएलमध्ये आकाश दीपने 8 सामने खेळून 7 विकेट्स आपल्या नावावर करण्यात यश मिळवले आहे. आयपीएल 2025 लिलावात 'लाल ऑफ बिहार' मुकेश कुमार आणि आकाश दीपवर पैशांचा पाऊस पडला. लखनौने आकाश दीपला 8 कोटी रुपयांना विकत घेतले, तर दिल्लीने आरटीएमद्वारे 8 कोटी रुपये देऊन मुकेश कुमारला आपल्या संघात समाविष्ट केले. मुकेश कुमारसाठी बोली 2 कोटी रुपयांच्या मूळ किंमतीपासून सुरू झाली, सीएसकेने मुकेशला विकत घेण्यासाठी पहिली बोली लावली. पण यानंतर पंजाब किंग्जनेही बोली लावायला सुरुवात केली. मुकेश कुमारला विकत घेण्यासाठी सीएसके आणि पंजाबमध्ये चढाओढ पाहिला मिळाली. जेव्हा किंमत 6.50 कोटींवर पोहोचली तेव्हा चेन्नईने माघार घेतली. यानंतर दिल्ली कॅपिटल्सचा संघ मैदानात उतरला.

# मुंबईने घेतलाय रहस्यमयी फिरकीपटू

## अफगाणिस्तानच्या खेळाडूवर मुंबईने मोठी बोली लावली

। नवी दिल्ली । प्रतिनिधी : महाईन्यूज

**आयपीएल 2025 च्या मेगा लिलावात मुंबई इंडियन्सने मोठा निर्णय घेतला आहे. मुंबईने अफगाणिस्तानच्या अल्लाह गझनफरला विकत घेतले आहे. तो फक्त 18 वर्षांचा आहे. गझनफरला मुंबईने 4.80 कोटी रुपयांना विकत घेतले आहे. त्याची मूळ किंमत 75 लाख रुपये होती. गझनफरच्या देशांतर्गत रेकॉर्ड चांगला राहिला आहे. यापूर्वी तो मुंबई इंडियन्सचा नेट बॉलरही होता.**



अल्लाह गझनफरवर पहिली बोली कोलकाता नाईट रायडर्सने लावली होती. यानंतर आरसीबीही या शर्यतीत सामील झाला. पण आरसीबीने शेवटची बोली 2 कोटी रुपयांपर्यंत लावली. केकेआरने तर 4.60 कोटींची शेवटची बोली लावली होती. मात्र, शेवटी मुंबई इंडियन्सने त्याला 4.80 कोटी रुपये मोजत आपल्या ताफ्यात सामील केले.अल्लाह गझनफरचा आतापर्यंतचा रेकॉर्ड चांगला आहे. तो मुंबई इंडियन्सचा नेट राहिल बॉलर आहे. त्याला व्हिसा न मिळाल्याने भारतात येऊ शकला नव्हता. पण तो आता मुंबईच्या मुख्य संघाचा भाग असेल. तो आतापर्यंत अफगाणिस्तानसाठी 8 एकदिवसीय सामने खेळला आहे. या कालावधीत 12 विकेट्स घेतल्या आहेत. मुंबई इंडियन्सनेही दीपक चहरवर पैसे खर्च केले. मुंबईने त्याला 9.25 कोटी रुपयांना खरेदी केले. चहरची मूळ किंमत 2 कोटी रुपये होती. संघाने रायन रिक्लेटनला एक कोटी रुपयांना खरेदी केले. मुंबईने कर्ण शर्माला 50 लाखात आणि रॉबिन मिंजला 65 लाखांना खरेदी केले. टीमने नमन धीरसाठी आरटीएमचा वापर केला.

### या खेळाडूंना ठेवले कायम

आयपीएल 2025 च्या मेगा लिलावात मुंबई इंडियन्सने मोठा निर्णय घेतला आहे. मुंबईने अफगाणिस्तानच्या अल्लाह गझनफरला विकत घेतले आहे. मुंबईने सूर्यकुमार यादव, रोहित शर्मा, हार्दिक पांड्या, जसप्रीत बुमराह आणि तिलक वर्मा यांना कायम ठेवले होते. राखून ठेवलेल्या खेळाडूंच्या यादीत बुमराहचे मानधन सर्वाधिक आहे. त्याला 18 कोटी रुपये मिळतील. सूर्या आणि हार्दिक यांना समान वेतन मिळेल.